REVIEWS OF LITERATURE
ISSN: 2347-2723
IMPACT FACTOR : 3.3754(UIF)
VOLUME - 5 | ISSUE - 4 | NOVEMBER - 2017

# ग्रेस यांच्या कवितेतील आईची प्रतिमा

डॉ. कविता मुरुमकर

प्रस्तावना :

ग्रेस हे मर्ढेकरोत्तर कालखंडातील आणि नवकवितेच्या प्रांतातील एक संवेदनशील कवी होय. मर्ढेकरोत्तर नवकवीच्या दुसऱ्या पिढीतील एक महत्वाचे कवी म्हणून त्यांची गणना होते. माणिक सीताराम गोडघाटे उर्फ ग्रेस यांनी मराठी साहित्यविश्वात मोलाचे योगदान दिले. त्यांचे पाच काव्यसंग्रह आणि सात ललित लेख प्रकाशित झाले आहेत. 'वाऱ्याने हालते रान' या त्यांच्या ललित लेखसंग्रहासाठी त्यांना 2012 सालचा साहित्य अकादमी पुरस्कार देण्यात आला. 'संध्याकाळच्या कविता', 'चंद्रमाधवीचे प्रदेश', 'सांध्यपर्वातील वैष्णवी', 'राजपुत्र आणि डार्लिंग', 'सांजभयाच्या साजणी', 'बाई!'जोगिया पुरुष' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. 'चर्चबेल', 'मितवा', 'वाऱ्याने हालते रान', 'ओल्या वेळुची बासरी', 'मृगजळाचे बांधाकाम, 'संध्यामग्न पुरुषाची लक्षणे', 'कावळे उडाले स्वामी' हे त्यांचे ललितलेख संग्रह आहेत. कवितेत प्रतिमेला महत्वाचे स्थान आहे. प्रतिमासृष्टी हा कवितेचा आत्मा आहे. कवितेचे स्वरुप म्हणजे अनेक प्रतिमांनी तयार झालेली एक प्रतिमाच असते असे म्हटले जाते.

प्रतिमा म्हणजे मानवी मनाच्या पटलावर प्रकटलेली इंद्रियसंवेद्य प्रतिकृती होय. डॉ. सुधीर रसाळ यांच्या मते, 'कवितेत आपणास अनेकदा दोन वस्तुची किंवा घटनांची साधर्म्यवैधर्म्याचा दृष्टीने तुलना केलेली आढळते किंवा दोन वस्तूंमध्ये किंवा घटनामध्ये एकात्मता जाणवून दिली जाते. उपामरुपकादी अलंकार म्हणून ओळखला जाणारा जो काव्यघटक आहे त्यालाच 'प्रतिमा' या संज्ञेने संबोधणारा समीक्षकांचा एक वर्ग आहे'. याचाच अर्थ प्रतिमा म्हणजे रुपक वा उपमा अलंकाराचेच दुसरे रुप होय. प्रतिमा हा ऐंद्रिय संवेदनेचे प्रकटीकरण करणारा कवितेचा महत्वाचा घटक आहे. काव्यशयाशी सुसंगता हा प्रतिमेचा निकष असून प्रतिमा कवितेच्या रुपाशी सुसंगत राहिल्यामुळे कवितेचा अर्थस्तर उंचावत जातो.

'आडवाच झोपलो असतो
मीही गर्भाशयात तर
येऊ दिले असते का
तुझ्या वाटयाला माउलीचे भाग्यपण?'

ग्रेसच्या या प्रश्नांतरच ग्रेसच्या जीवनाचा आणि समग्र कवितेचा सारांश आहे कारण या प्रश्नातच ग्रेसचे आईवरचे नितांत प्रेम आणि अनाकलनीय, गूढस्थ वैरभाव दिसून येतो. त्र्यं.वि. सरदेशमुख यांना वाटते, 'आईपणाचे भाग्य तिला आपण बहाल केले ही प्रौढी बोलण्यासाठी का होईना, त्या गर्भव्यूहातून या जगात आपल्याला सुखरुप यावे लागते. तसा अडवा प्रसंगच आला तर बळाला एक श्वासाचाही उसंत मिळू दिली जात नाही. आईचे प्राण वाचवले जातात. असे असता, आंदण मिळालेल्या जीवनाला तुच्छ भिक्षा म्हणायला आईविना जागा तरी कोणतीध... आई पुन्हाःपुन्हा हरवत होतीः याचा अर्थ पुन्हाःपुन्हा ती गवसत होती. पण ती आपली आहेच याचा पडताळा कधीच मिळत नव्हता.' ग्रेसच्या कवितेत आईविषयी वाटणाऱ्या अनावर प्रेमामुळे आणि अत्यंतिक द्वेषामुळे या परस्परविरोधी भावनांमुळे आईची प्रतिमा व्यमिश्र,जटिल, दुर्बोध होते. ग्रेसमुळे आईला'आई' होण्याचे भाग्य लाभले असले तरी आईने मात्र त्यांना वात्सल्य दिले नाही. आईच्या वात्सल्यावर बळीचा जन्मसिध्द हक्क असतो परंतु तो हक्क आईनेच नाकारला, झिडकारला !

'आईने
झिडकारुन दिलेल्या मुलासारखा अनावर
कोसळतोय.... पाऊस, अनावर
कोसळतोय !...

आई गेल्यानंतरचा पोरकेपणा कीव समजू शकतो, परंतु आई असूनही ती स्वतःच्या मुलाला झिडकारुन देते आहे, ही पोरकेपणाची भयानकता अनावर कोसणाऱ्या पावसासारखी वाटते. ग्रेसच्या कवितेत आईने झिडकारल्याच्या अनेक अस्फूट नोंदी सलत राहणाऱ्या आहेत.

'रंगीत खेळणी माझी
ही दे ना मज खेळाया
इवल्याशा बाळमुठीतून
घे काढुनी अपुली काया'

घरकामात व्यस्त असलेली आई बाळाला

गुंतवण्यासाठी रंगीत खेळण्याचा पसारा त्याच्यासमोर ठेवते आणि त्याच्या बाळमुठीतून स्वतःला सोडवून घेवून घरकामे आवरते. ग्रेसच्या बाल्यावस्थेत ग्रेसची आई मात्र आपल्या बाळाच्या बाळमूठीतून आपली काया काढून दूर कुठेतरी निघून जाते. बाळमूठीतून आपली काया काढून आई बाळाच्या आसपास असलेल्या आईच्या अस्तित्वाची त्याला जाणिव असतेच. ग्रेसची आई मात्र बाळमूठीतून स्वतःला  सोडवून घराबाहेर दूर कुठेतरी निघून जाते. 'आई कुठे जातेय' या प्रश्नाची सल घेवून ग्रेसची कविता आईचं आईपण शोधत राहते. 'पळस या कवितेत ग्रेस सांगतात,

'त्याला ठेवून एकटा
अशी उठले घाईने
शेजी वाळलया देहाचे त्याच्या मनात चांदणे
घर राखील तयाचे
ओवी मागचा केवडा
मग नागवी मी झाले
प्राणरतिचिया चाडा'

ग्रेसच्या संवेदनविश्वावर मायेचे पांघरुन घालायचे सोडून आईने सतत अस्वस्थ करणारी असुरक्षिततेची जाणीव ग्रेसच्या बालजीवाला दिली. न सोसणाऱ्या दुःखाने कवीच्या आयुष्यावर पोरकेपणाचे पांघरुन घातले,

'जे सोसत नाही असले
तू दुःख मला का द्यावे'

संध्याकाळी आईचे नसणे हे ग्रेसच्या मनावर पोरकेपणाचे व असुरक्षिततेचे ओरखाडे उमटवून जाते.

'माझी आई
संध्याकाळी कधीही घरी नसायची'
'वाट' या कवितेत आईची वाट पाहणारा कवी म्हणतो,
'मी पाहतो झाडांकडे, पहाडांकडे,
तू येशील म्हणून आज्ञाताच्या पारावरती
एक नसलेली पणती लावून देतो....
आणि आई नसलेल्या पोरासारखे हे माझे
शहाणे डोळे, हलकेच सोडून देतो
नदीच्या प्रवाहात...'

आई नसलेल्या पोराचे शहाणे डोळे या काव्यपंक्ती अर्थपूर्ण आहेत. आई नसलेल्या पोरकेपणाने त्याला शहाणे बनविले आहे. ते शहाणपण इतके आहे की, आई येणार नाही आधीच ठावूक असलेले सत्य उराशी बाळगून तो आईची वाट पाहत बसतो. डोळे शहाणे असूनही न येणाऱ्या आईची वाट बघण्याची निरर्थक क्रिया करतात आणि आई येईल म्हणून झाडाकडे, पाहाडांकडे पाहत दृष्टीच्या पलिकडे असलेल्या कालप्रवाहात कवी शहणपण आणि पोरकेपण हलकेच सोडून देतो.

डॉ. अक्षयकुमार काळे यांना दिलेल्या मुलाखतीत ग्रेस 'आई' विषयी म्हणतात, 'आई एकतर सर्जनाचे प्रतीक. मातृत्वाचे प्रतीकवात्सल्याचे प्रतीक अशा सांस्कृतिक अर्थाचे आवतरण  घेऊनच आतापर्यंत मराठी काव्यात अवतरली आहे. माझी 'आई' तशी नाही. शी स्टॅंडस इन माय पोएट्री ॲज अ सुप्रिम सिम्बॉल ऑफ एंटायर वुमनहूड किंवा फ्रईडने जो 'मदर फिक्सेशनचा' सिध्दांत मांडला आहे. त्यातही माझ्या आईची प्रतिमा चपखलपणे बसू शकत नाही... माझी आई माझी प्रेयसी. माझी आई माझ्या सुख दुःखाचे चिन्ह, माझी आई माझ्या वासनांचे स्मृतिरुप जागरण, माझी आईस्त्री देहाच्या शक्तीचे अंतिम भयाण केंद्र, माझी आई माझे क्रौर्य आणि माझी आईमाझी करुणा...' हे विधान महत्त्वपूर्ण वाटते.

'ते भरताराचे स्पर्श
घर धुक्यात बुडूनी जाई
देहावर दुःख पसरते
संभोग सुखाने आई ...'

नर आणि मादी सुखाच्या लालसेने एकत्र येत असले तरी क्षणभंगूर सुखातून दुःखभोगाचा जन्म होतो. सुखात दुःखाचे बीज असते. निर्मितीत विनाशाचे बीज असते, जीवनात मरणाचे बीज असते, परस्परांना छेदून भावकल्लोळ माजवणाऱ्या या क्रिया कीव जाणून आहे परंतु आई मात्र या वासनाभोगाकडे 'संथ तरंगत' जाते.

'या प्रदोष पूजेसाठी

तू संथ तरंगत जाशी
मी चंद्र खुडाया गेलो
शब्दांच्या खोल तळशी'

आई दैहिक वासनांना थोपवू शकत नाही. त्या मनस्वीनीचे स्वतःच्या देहावर इतके प्रेम आहे की,

'ती अशीच भटकत राहे
चांदणे जसे वेल्हाळ
पसरले तिच्या रोखाने
आभाळच रानोमाळ
चोरुन अमेच्या रात्री
देवळात आई गेली
अन् बालपणावर माझ्या
चंद्राची राख पसरली.'

ग्रेसच्या बाल्यावस्थेत आईच्या स्वैराचाराचे मानसिक आघात इतके आहेत की, शब्दांच्या खोल तळाशी ते चंद्र खुडायला जातात. गायीच्या शोधात वासराने हंबरत रानोमाळ हिंडावे तसे ते आपल्या कवितेतून अखंडपणे आईचा शोध घेत राहतात.

आईच्या वात्सल्याअभावी आलेले पोरकेपण हे आईविषयीच्या कविताशयाचा क्रेंद्रबिंदू आहे. ग्रेस सांगतात,' आई गेल्यापासून जो अनाथपणा आला आहे तो मात्र नंतर जीवनातल्या कोणत्याही नात्यांनी मोहरी एवढा सुध्दा भरुन निघालेला नाही. पण त्याचबरोबर माझ्या अंगावर अनाथपणाचे हे लक्तर ज्या बिंदूपाशी आईन भिरकावले, त्याच बिंदूपासून मी पळत नसतानाही ती माझ सारखा पाठलाग करते आहे. ती सतत अवतीभोवती आहेच.' यावरुन ग्रेसच्या भावविश्वातील आईचे स्थान स्पष्ट होते.

ग्रेसच्या भावविश्वातील वारा हा आईच्या प्रियकराचे प्रतीक असावे. आषाढाच्या काही कथा ऐकायला गेलेल्या मोराचा सारंग पिसारा घेऊन पळणारा वारा कवीला वैऱ्यासारखा वाटतो. ग्रेसच्या कवितेत 'वारा' दारापाशी रेंगाळतो, दारावर धडका देतो, दार उघडे असता बेभानपणे आत शिरतो. पक्ष्यांची घरटी असलेली झाडे उन्मळून पाडणारा, वृक्षांमध्ये सैरावैरा सोसाटयाने धावणारा वारा कवीला असुरक्षिततेची भावना देतो'.

'संध्याकाळी आई
देवघरात रडते
तिच्या पदाराच्यामागे
केवडयाचे पाते...
आम्ही भावंडेही
भय डोळी वागवितो
चांदण्यात आईसाठी
वारा दारी येतो...'

'पाऊसगाणे' कवितेत कवीच्या मनातील वाऱ्याचे भय अधिक जाणवते,

'इवल्याशा पक्ष्यांच्या डोळी
वृक्ष थबकले सारे
आणि मुळाला त्यांच्या उपटे
वेडे घेतले वारे'

कवीला नीज येता आईने जवळ घेवून थोपटावे वाटते पण आईचा प्रियकर तिला घेऊन जातो. बालमनाची झोप उडते. बालमनाचं दुःख घराच्या भिंतीच जाणू शकतात,

'ही नीज घेऊनी माझी
हा वारा जातो कोठे
दगडाच्या भिंतीनाही
हे दुःख वाटते मोठे'

आई ग्रेसचा द्वेष करीत असली तरी ग्रेसने आईचे द्वेष कधी केला नाही. पुन्हा पुन्हा तिच्या कुशीत ते वात्सल्य आणि बालपण शोधतात.

'मी पुन्हा पुन्हा शोधावा
या कुशीत घुंगरवाळा'

त्र्यं.वि.सरदेशमुख यांना लिहलेल्या पत्रात आईविषयी ग्रेस म्हणतात, 'मी पळत नसतानाही माझ सतत पाठलाग करणारी ही एवढीच व्यक्ती माझ्या चिमूटभर आयुष्यात. एवढा चरचरीत द्वेष कुणी केला नाही माझा. मृत्यूच्या वेळी मी तिच्या डोक्याशी जाऊन उभा राहिलो. मला वाटले जाता जाता ती माझ्या बापाचे नांव सांगेल. अत्यंत छद्मी हसून तिने श्वास सोडला आणि तेव्हापासून या विराट जगात माझा अनुवंशाचे हरवलेले लहानसे मूळ मी शोधतोय'

वरील संदर्भावरुन ग्रेस यांच्या कवितेत येणारे कर्णकुंती या मिथक प्रतिमांचा अन्वयार्थ अधिक नेमकेपणाने लक्षात येतो. आईने दिलेले दुःख आईचा आशीर्वाद समजून ग्रेसने आयुष्यभर कवितेतून आईचा अखंड शोध घेतला आहे.

'मला वेळीअवेळी रडायला येते ते
ते तूझे गाणे नाही
आईच्या कुशीत आशीर्वाद आहे तो !'

ग्रेसच्या कवितेत आईची प्रतिमा महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते. ग्रेसच्या कवितेतली आई त्यांच्या भावविश्वाप्रमाणे काव्यविश्वातही व्यापून असल्याचे दिसून येते.

## निष्कर्ष :—

1. प्रतिमा म्हणजे मानवी मनाच्या पटलावर प्रकटलेली इंद्रियसंवेद्य प्रतिकृती होय. ग्रेसच्या मनाच्या पटलावर उमटलेली आईची प्रतिमा अर्थपूर्ण असल्याचे दिसून येते.
2. ग्रेसच्या आईने ग्रेसच्या संवेदनविश्वावर मायेचे पांघरुन घालायचे सोडून सतत अस्वस्थ करणारी असुरक्षिततेची जाणीव ग्रेसच्या बालजीवाला दिली. एका न सोसणाऱ्या दुःखाने कवीच्या आयुष्यावर आईने पोरकेपणाचे पांघरुन घातल्याचे जाणवते.
3. आई नसलेल्या पोराचे शहाणे डोळे या काव्यपंक्ती अर्थपूर्ण आहेत. आई नसलेल्या पोरकेपणाने त्याला शहाणे बनविले आहे. ते शहाणपण इतके आहे की, आई येणार नाही आधीच ठावूक असलेले सत्य उराशी बाळगून तो आईची वाट पाहत बसतो.
4. ग्रेस यांच्या कवितेत येणारे कर्णकुंती या मिथक प्रतिमांचा अन्वयार्थ अधिक नेमकेपणाने लक्षात येतो. आईने दिलेले दुःख आईचा आशीर्वाद समजून ग्रेसने आयुष्यभर कवितेतून आईचा अखंड शोध घेतला आहे.
5. ग्रेसच्या कवितेतली आई त्यांच्या भावविश्वाप्रमाणे काव्यविश्वातही व्यापून असल्याचे दिसून येते.

## संदर्भ :—

1. डॉ. काळे अक्षयकुमार, 'ग्रेसविषयी', विजय प्रकाशन, नागपूर, 2009
2. सरदेशमुख त्र्यं.वि., 'धुके आणि शिल्प', सन पब्लिकेशन्स, 1985,
3. ग्रेस, 'राजपुत्र आणि डार्लिंग, अमेय प्रकाशन, नागपूर प.आ.1973
4. ग्रेस,'संध्याकाळच्या कविता', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई प.आ.1967
5. ग्रेस, ' चंद्रमाधवीचे प्रदेश' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई प.आ.1991